तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk2@dte.org.in Internet :http://www.dte.org.in

SPEED POS

क्रमांक : २/एनजीसी/न्याप्र/२०१०/ 1674
दिनांक : 7 SEP 2010

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- एस.एल.पी.(सी) क्र.१३९४४/२००९
भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनियरींग व इतर वि. महाराष्ट्र शासन व इतर

संदर्भ :- १)रिट याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी दि.०३/१२/२००८ रोजी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात..
२)या कार्यालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/न्याप्र/२००९/४०९, दि.१९/०६/२००९
३) शासनाचे दि. १ जुलै २०१० चे पत्र

उपरोक्त विषयासंदर्भात अपणांस कळविण्यात येते की, मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.२२१६/२००६ अन्वये यांनी दिलेल्या आदेशास अनुसरून राज्यातील अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविण्या-या संस्थांमध्ये दि.३१/०५/२००९ पुर्वी प्राचार्य/संचलकांचे पद भरण्याबाबत कार्यवाही करण्यास या कार्यालयाने आपणांस आपल्या विभागांतर्गत सुरू असलेल्या सर्व संस्थांना निर्देश देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांना याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यास कळविण्यात आले होते. याबाबत पुढे असे कळविण्यात येते की, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशाच्या विरूध्द काही संस्थांनी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विविध एस.एल.पी. दाखल केलेले होते आणि त्यामध्ये मध्यंतरीच्या कालावधीसाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थगीती दिलेली आहे.

शासनाच्या संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत सुरू असलेल्या सर्व अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविण्या-या संस्थांमध्ये प्राचार्य/संचालक यांचे पद भरण्याबाबत संस्थेने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात (इंग्लिशमध्ये) सर्व संस्थांकडुन प्राप्त करून व आपल्या स्तरावर एकत्रित करून या संचालनालयास दि.१५/०९/२०१० पर्यंत सादर करावा, तसेच ई-मेल devidasgangawane@yahoo.com या आयडी वर ई-मेल व्दारे पाठवावे. जेणेकरुन सदरहू माहिती शासनामार्फत सर्वोच्च न्यायालयात त्वरीत सादर करणे सुलभ होईल.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
9 SEP 2010
आवक क्र. 6482

(डॉ.एस.के. महाजन)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

प्रत : मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर. (लक्षवेध :- श्री. बी.एम. [illegible], अवर सचिव)

जा.क्र.- विकापु/आस्था-२/माहिती/२००९/ 2203
स्मरणपत्र

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे:-४११०१६.
दिनांक:- 21 SEP 2010

संदर्भ:-विकापु/आस्था-२/माहिती/२००९/८४३२, दिनांक १३-९-२०१०.

या कार्यालयाचे संदर्भीय पत्राकडे आपले लक्ष वेधू इच्छित आहे. सोबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्राची छायापत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यांत येते की, संदर्भाधीन विषयाची आपले संस्थेची माहिती विहित प्रपत्रात दिनांक १४-९-२०१० पूर्वी या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत आलेले होते. सदर प्रकरणी उच्च न्यायल मुंबई खंडपीठ नागपूर यांचे आदेश असल्याने या प्रकरणी प्रथम प्राधान्याने कार्यवाही करणे आवश्यक असल्याने ज्या संस्थांनी सदरची माहिती सादर केली नाही त्यांनी ती त्वरीत सादर करावी.

(बी.डी. मिसाळ)
प्रशासकीय अधिकारी
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रती:- प्राचार्य/संचालक, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्याक्रम संस्था.
प्रत:- श्री. शिंदे प्रोग्रॅमर वि. का. पुणे यांना माहितीसाठी त्यांना कळविण्यांत येते की, संदर्भाधिन पत्र,सहपत्रासह या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यांत यावे.